

## १. अडगुलं मडगुलं

अडगुलं मडगुलं
ोन्याचं कडगुलं
्प्याचा वाळा
तान्हचा बाळा
तीट टिळा

BVBK-0402797








# ६. भटो भटो

भटो भटो, कुठे गेला होतात?
कोकणात.
कोकणातून काय आणले?
फणस.
फणसात काय?
गरे.
गऱ्यात काय?
आठिळा.
तुम्ही खा गरे
आम्ही खातो गरे.
म्हशीला काय?
चारखंड.





# ७. चांदोबा






चांदोबा लपला
  झाडीत......
आमच्या मामाच्या
  वाडीत......
मामाने दिली
  साखरसाय......
चांदोबाला
  फुटले पाय.....
चांदोबा गेला
  राईत......
मामाला नव्हते
  माहीत......

—कल्याण इनामदार

# ८. माऊची पिल्लं

मनीच्या कुशीत
झोपलंय कोण?

इटुकली पिटुकली
पिल्लं दोन

मिच् मिच् डोळे
टिल्ले कान

माऊची पिल्लं
गोरीपान

—आशा गवाणकर



# ९. लाडोबा

खबडक् खबडक्
घोडोबा.

घोड्यावर बसले
लाडोबा.

लाडोबाचे लाड
करतंय कोण?

आजोबा आजी
मावश्या दोन!

—आशा गवाणकर





## १०. अगडं बगडं

अगडं बगडं डं चिकी डंग
गोल गोल फुग्याचा लाल लाल रंग
तिरकिट तिरकिट तडम् तडम्
फू फू फुगा फुगला टम्
कडकट् कडकट् कडाड् कट्
फू फू फुगा फुटला फट्


—राजा मंगळवेढेकर

# ११. फजिती-भोवऱ्याची

गरगर फिरून
दमला भोवरा
मनात म्हणाला
थांबू का जरा?

पण एका पायावर-
उभं कसं राहयचं?
सारखं डोकंच-
खाली जायचं.

—पद्‌मिनी बिनीवाले



# १२. लव लव साळूबाई

लव लव साळूबाई, मामा येतो
झुक झुक गाडीतून, नेईन म्हणतो.


अटक मटक, मामी येते
छानसा बॅटबॉल, देईन म्हणते.

अबरू गबरू, येतो बंटचा
देईन म्हणतो, सगळ्या गोटया.

नको नको मी, इथेच बरा
आईच्या कुशीतच, आनंद खरा.

—शकुंतला लिमये







## १३. कोण काय म्हणतंय?

चाळणीतलं पीठ
म्हणे, "चाळ मला नीट."

कोपऱ्यातली काठी
म्हणे, "लागेन हं पाठी."

पावसातला वारा
म्हणे, "गारा वेच गारा."

कढईतली पुरी
म्हणे, "किती मी गोरी."

आता माझी पाळी,
"हवी लिमलेटची गोळी."



—माधव गवाणकर




## १४. खार बाई खार

खार बाई खार
नाजुक नार
शेपूट सुन्दर
झुबकेदार

खार बाई खार
भित्री फार
पाउल वाजताच
झाली पसार

खार बाई खार
चपळ फार
क्षणात होते
नजरे पार

—श्रीकृष्ण वैद्य






# १५. बाळाचं जेवण

पापड खाल्ला कर्रम् कर्रम्
लोणचं खाल्लं चटक् मटक्

भात खाल्ला गुटू गुटू
कढी प्यायली भुरक् भुरक्

चटणी खाल्ली एक बोट
भरलं बाळाचं पोट पोट

ढेकर आली ढुरक् ढुरक्
बाळ हसलं खुदुक् खुदुक्

—सरिता पदकी

# १६. हरले हप्!

हरले हप्! बसले गप

कर ग आजी
भेंड्याची भाजी

नको ग रडू
कारले कडू


फुगले नाक
पाठीला बाक


पिकले केस
तोंडाला फेस


हळुबाई हळू
शिजले अळू


हरले हप्! बसले गप

—विंदा करंदीकर









## १७. इटुक्क मिटुक्क

इटुक्क मिटुक्क
चिंचेचं बुटुक्क


लाल लाल चिंच
तोंड झालं चुटुक्क

मीठ मसाला
कैरीची फोड

चन्या मन्या
आंबट गोड

—पद्मिनी बिनीवाले

# १८. खेळायला चला



टक् टक् घड्याळ
टण् टण् टोला
चला आता चला
खेळायला चला




फू बाई फू
फुगडी फू
झिम् पोरी झिम्
झिम्मा झिम्



लप् लप् लप् – लपंडाव
धाव धाव धाव – धावाधाव
धिंग् धिंग् धिंग् – लंगडधिंग
हरले हप् टिंग् टिंग् टिंग्

—आशा गवाणकर





## १९. माझ्या या दारातून

माझ्या या दारातून
कोण कोण येतेऽ कोण कोण येतेऽ

मामा येतो नि मामी येते
गोड गोड खाऊ देऊन जाते
काका येतो नि काकी येते
छान छान बाहुली देऊन जाते

माझ्या या घरातून
कोण कोण येतेऽ कोण कोण येतेऽ

दादा येतो नि वहिनी येते
चणे फुटाणे देऊन जाते
बाबा येतात नि आई येते
गोड गोड पापी घेऊन जाते

—अनुताई वाघ




## २०. सर सर उंच

सर सर उंच
वाढलं झाड
बघता बघता
ढगाआड


ढगांचं झालं
पाणीच पाणी
झाडाला सुचली
गोड गाणी

गाण्यांची झाली
फळं फुलं
वेचायला आली
मुली मुलं

—पद्मिनी बिनीवाले



# २१. बबल्गम





आधी बाबा
देतात दम
मग आणतात
बबल्गम

आधी बाबा
देतात छडी
मग चॉकलेटची
मिळते वडी

आई घेते
वाचून धडा
मग देते
बटाटेवडा

—मंगेश पाडगावकर







## २२. कोणाला काय हवे?






कावळ्याला हवे
मेणाचे घर
बेडकाला हवी
पावसाची सर
चिमणी टिपते तांदळाचा दाणा
उंदीर शोधतो तेलाचा घाणा
कपाटावर ठेवला
लोंण्याचा गोळा
मनी माऊचा
त्यावर डोळा
पोपट मागतो कच्चा पेरू
चॉकलेटसाठी रडतो बाळू




—आशा भाजेकर

# २३. जेऊ घाल



अग, अग, चिमणे,
हे धर दाणे
दाणे आहेत
चिमूटभर
सांडू नकोस
वाटेवर



पोळ्या कर
आठ नऊ
भात कर
मऊ मऊ
पिल्लुकल्यांना न्हाऊ घाल
पोटभर जेऊ घाल

—आशा गवाणकर




# २४. बुड बुड घागरी



बुड बुड घागरी बूड ग
नदीला आला पूर ग
उड उड पाखरा ऊड रे
आकाशाला भीड रे
झर झर झोक्या वर जा
हळुच वाकून पहा जरा
खाली उभे कोण रे?
इन मीन तीन रे

—पद्‌मिनी बिनीवाले







## २५. खूप खूप मजा

ढुम् ढुम् ढोलकं
पीं पीं बाजा
आज आहे आमची
खूप खूप मजा
छान छान भावली
भावलीचा नवरा
लगीन लागलं
पसारा आवरा

—आशा गवाणकर



## २६. थेंबा थेंबा

थेंबा थेंबा थांब थांब
दोरी तुझी लांब लांब
आकाशात पोहोचली
तिथे कशी खोचली?

सर सर सर सर धावतोस
सरी वर सरी गुंफतोस
सरी तुझ्या मोत्यांच्या
रुप्याच्या की सोन्याच्या?

सरी तुझ्या ओल्या
गंगेत जाऊन न्हाल्या

—ताराबाई मोडक







## २७. बाहुलीची शाळा

बाहुलीचं नाव आई
घालूया का शाळेत?
मीच घेऊन जाईन तिला
शाळेच्या वेळेत.

आई तिला गणवेष
देशील ना शिवून?
छोटंसं दप्तर
देशील ना घेऊन?

डबा बिबा नको आई
सांगू का तुला?
माझ्यातली पोळीभाजी
देईन मी तिला

—आशा गवाणकर




## २८. मिठ्ठू

इट्टु पिट्टू
मिया मिठ्ठूऽ
चोच रंगीत
लाल लाल
पांघरतात
हिरवी शाल
खातात काय?
डाळिंब दाणे
बोलतात कसं?
मंजुळवाणे

—निर्मला देशपांडे

## २९. मोरा, मोरा!

मोरा, मोरा
काय तुझा तोरा!
रंगीत पिसारा
डोक्यावर तुरा

बघ, वर बघ
आले आले ढग

एक पाय दुमडून
पिसारा उघडून
नाच तर खरा
मोरा, मोरा!

—सरिता पदकी



# ३०. हम्मा


हम्मा हम्मा ये ग
बाळाला दूध दे ग
चारा पाटीभर
हम्माला
दूध वाटीभर
बाळाला

हम्माच्या गळ्यात
घुंगूरमाळा
बाळाच्या पायांत
चांदीचा वाळा


वाळा वाजतो
छुम छुम
बाळ धावतो
धूम धूम

—इंदिरा अत्रे









# ३१. नंदूचा घोडा
## चंदूचा वाडा




चकमक अंगण
अंगणात रिंगण
रिंगणात घोडा कोणाचा? कोणाचा?
रिंगणात घोडा नंदूचा, नंदूचा

लखलख अंगण
अंगणात रिंगण
रिंगणात वाडा कोणाचा? कोणाचा?
रिंगणात वाडा चंदूचा, चंदूचा

नंदूचा घोडा
चंदूचा वाडा
नंदू जातो घोड्यावर, घोड्यावर
चांदोबाच्या वाड्यावर, वाड्यावर

—वसंत बापट

## ३२. कोण? कोण?



पहाट झाली – सांगतं कोण?
कुकुऽच् कोंबडा – आणखी कोण?


उठा उठा लवकर – सांगतं कोण?
विठू-विठू पोपट – आणखी कोण?

ताजं-ताजं दूध – देतं कोण?
गोठ्यातली हम्मा – आणखी कोण?

चोरून दूध – पितं कोण?
म्याँव-म्याँव माऊताई – आणखी कोण?

घराची राखण – करतं कोण?
भू-भू कुत्रा – आणखी कोण?

बागेतली भाजी – खातं कोण?
मऊमऊ ससेभाऊ – आणखी कोण?



## ३३. बघितलीय गंमत!

भोवऱ्याला असतो एकच पाय!
दुसऱ्या पायाचे कामच काय?


फोनला असतो एकच कान
ऐकून ऐकून होतो हैराण!

तीन हात फिरवत भोवती
पंखा म्हणतो 'उकडतंय किती!'

गिरणीचे तोंड केवढे मोठ्ठे
पोते पोते गहू खाते!

मोराच्या पिसाऱ्याला शंभर डोळे
कुणी निळे कुणी जांभळे!

—पद्मिनी बिनीवाले



# ३४. भावले, भावले!

भावले भावले डोल ग
चुटू चुटू बोल ग
दूदू पी कपभर
मग घेईन कडेवर


रडू नको थांब थांब
राहचलंय माझं काम काम

काम करून घेईन तुला
नेईन भूर देईन फुगा


येईल गंमत खूऽप खूप
आता झोप गूऽप चूप!


—सरिता पदकी





# ३५. बाळाचे दोस्त







एक चिऊ आली
बाळाला पाहून गेली

एक पोपट आला
पेरू देऊन गेला

एक खार आली
बोरं देऊन गेली



एक पारवा आला
जांभळे देऊन गेला



एक साळुंखी आली
आवळे देऊन गेली

मग आला कावळा
सगळं घेऊन गेला

—राजा मंगळवेढेकर



# ३६. या या आनंदाने खेळू या

(अभिनय गीत)

या या आनंदाने खेळू या
ठुमकत ठुमकत चालू या ।।धृ।।

हाताचे हे पंख पसरुनी
भुर्रकन उडूनी जाऊ या ।। १ ।।

हाताचा करू मोर पिसारा
थुई-थुई-थुई-थुई नाचू या ।। २ ।।

हाताचे करू कान सशाचे
टुण्-टुण्-टुण्-टुण् जाऊ या ।। ३ ।।

—ताराबाई पर.जपे



# ३७. सुपलीबाई, सुपलीबाई


## (अभिनय गीत)

सुपलीबाई, सुपलीबाई, काय करता?
गहू मी पाखडते भराभरा




जातेराव, जातेराव, काय करता?
गहू मी दळतो भराभरा

चाळणीबाई, चाळणीबाई, काय करता?
पीठ मी चाळते भराभरा




लाटणेराव, लाटणेराव, काय करता?
पोळ्या मी लाटतो भराभरा

आई बाई, आई बाई, काय करता?
वाढून मी टाकते झटाझटा



बाळासाहेब, बाळासाहेब, काय करता?
जेऊन मी टाकतो मटामटा




## ३८. होऊ या–होऊ या

(अभिनय गीत)



टुणु-टुणु टुणु-टुणु बेडुकताई
डरांव-डरांव बोलत राही.
आपण उड्या मारू या। बेडुकताई होऊ या।। १।।

लुसु-लुसु लुसु-लुसु सस्सेभाऊ
कोवळा पाला हाती घेऊ
हिरव्या कुरणी धावू या। सस्सेभाऊ होऊ या।। २।।



हळु-हळु हळु-हळु हत्ती डोले
लांब सोंड ती मजेत हाले
डोलत डोलत चालू या। हत्तीदादा होऊ या ।। ३।।



टप्-टप् टप्-टप् आवाज येई
घोडेदादा धावत जाई
त्याच्यामागे धावू या। घोडेदादा होऊ या ।। ४।।

सुरु-सुरु सुरु-सुरु मासळी होऊ
पाण्यामध्ये लपून राहू
तिच्यासंगे पोहू या। मासळीताई होऊ या ।। ५।।






# ३९. पावसा पावसा

(अभिनय गीत)

पावसा पावसा सरसर ये
पावसा पावसा भरभर ये
सरीमध्ये नाचू दे – ओलंचिंब होऊ दे
होडी माझी बनवू दे – होडी होडी खेळू दे



होडी माझी शिडाची
सुरू सुरू चालायची
होडी माझी बंबाची
दूर देशा निघायची.

चला सारे गावाला
या रे सारे हिंडायला
दूर दूर भटकायला
पावसामध्ये नाचायला



—सुमती पायगावकर

# ४०. पळा रे पळा

(अभिनय गीत)

पळा रे पळा
गोलावर सर्वजण पळा रे पळा


उडा रे उडा
वाऱ्यावर सर्वजण उडा रे उडा

नाचा रे नाचा
थय थय थय थय नाचा रे नाचा

हसा रे हसा
हा, हा, ही, ही, हसा रे हसा

बसा रे बसा
गोलावर सर्वजण बसा रे बसा

निजा रे निजा
डोळे मिटुनी शांत जरा निजा रे निजा



BVBK-0402797




## २. ये रे ये रे पावसा

ये रे ये रे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा !

पाऊस पडला झिम् झिम्
अंगण झालं ओलं चिंब
पाऊस पडतो मुसळधार
रान होईल हिरवंगार

# ३. ये ग ये ग सरी

ये ग ये ग सरी
माझं मडकं भरी
सर आली धावून
मडकं गेलं वाहून




BVBK-0402797




# ४. आपडी थापडी






आपडी थापडी
गुळाची पापडी
धम्मक लाडू, तेल काढू!
तेलंगीचे एकच पान
दोन हाती धरले कान!
चाऊ माऊ, चाऊ माऊ!
पितळीतले पाणी पिऊ!
हंडा पाणी गडप!